# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची बुधवार दिनांक २८.२.९० रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या ४७ व्या सभेचा कार्यवृत्तांत

### सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] श्री. ईश्वर भोसीकर | :- | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. अ.म. महाजन | :- | उपसभापती/औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. द.मो. गोडघाटे<br>उपसंचालक, नगररचना,<br>औरंगाबाद. | :- | सदस्य |
| ४] श्री. जंबगी,<br>कार्यकारी अभियंता,<br>महानगरपालिका,<br>औरंगाबाद. | :- | सदस्य प्रतिनिधी. |

विषय क्र. १:- मंडळाच्या दिनांक ३०.१.१९९० रोजी झालेल्या ४६ व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २४५

दिनांक ३०.१.१९९० रोजी झालेल्या ४६ व्या सभेच्या कार्यवृत्तांवर चर्चा होऊन कायम करण्यांत आला.

विषय क्र. २:- औरंगाबाद मंडळाने बांधलेल्या गाळयांच्या किंमतीमध्ये झालेल्या वाढीला मंजूरी देणे.

ठराव क्र. २४६.

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने एन-६ भाग-२ सिडको नविन-औरंगाबाद येथे बांधलेल्या ८२ उच्च उत्पन्न गटातील गाळयांच्या वाढीव किंमतीस मान्यता दिली.

विषय क्र. ३:- जळगांव येथील सरकारी जमिन घेऊन शासकीय कर्मचा-याकरिता घरबांधणी योजना राबविण्याबावत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, जळगांव येथे गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्यासाठी १९७८-७९ पासून खाजगी व शासकीय जमिन संपादनाचे प्रयत्न करण्यांत आले. परंतू हितसंबंधीताकडून भूसंपादनास स्थगिती मिळाल्यामुळे मंडळास जमिन प्राप्त होऊ शकली नाही. शासनाने ६०:४० तत्वाचा अवलंब केला. तरीही पुरेशी जमिन मिळू शकली नाही.

उपसभापतींनी असे सांगितले की, जळगांव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जळगांव येथील १४८ हेक्टर शासकीय जमिन मंडळास गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी देऊ केली आहे. परंतू या शासकीय जमिनीवर पांच गृहनिर्माण संस्थेस ४३ हेक्टर जमिन राखून ठेवली असल्याचे जिल्हाधिकारी ह्यांनी कळविले आहे व सदर संस्थेच्या सभासदांना गृहनिर्माण मंडळाने त्यांच्या योजनेत समाविष्ट करुन घेतल्यासच शासकीय जमिन मंडळास देऊ असे जिल्हाधिका-याकडून सांगण्यांत आले आहे.

यावर चर्चा करतांना सभापतींनी सांगितले की, शासकीय जमिन त्वरीत घेऊन योजना कार्यान्वित कराव्यात व तेथील पांच गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांना मंडळाच्या योजनेत समाविष्ट करुन घेण्यास व जळगांव येथील शासकीय जमिन मंडळास हस्तांतरीत करण्यासाठी शासनास प्राधिकरणामार्फत विनंती करावी. प्राधिकरणाची मंजूरी घेण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत यावा.

ठराव क्र. २४७

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने जळगांव येथील शासकीय जमिनीवर पुर्वनिर्धारीत समुहासाठी गृहनिर्माण योजना राबविण्यास्तव खास गृहनिर्माण योजना म्हणून प्राधिकरणाची मान्यता घेण्यासाठी आणि जळगांव येथील शासकीय जमिन मंडळास त्वरीत मिळावी म्हणून शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्याचा मंडळाने निर्णय घेतला.

विषय क्र. ४:- मंडळाच्या वसाहतीमध्ये सुविधासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वाटप.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी माहिती दिली की, मंडळाच्या वेगवेगळया वसाहतीमध्ये सुविधासाठी भूखंड राखून ठेवलेले आहेत. त्याचे वितरण करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कारण सदर भूखंडावर भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता आहे.

या विषयावर चर्चा चालू असतांना उपसभापतींनी सांगितले की, सहयोगनगर नांदेड येथील वसाहतीत पोष्ट ऑफिससाठी असलेल्या ३२० चौ. मी. च्या भूखंडावरील आरक्षण बदलावे. या चर्चेत श्री. द. मो. गोडघाटे यांनी सहयोगनगर या वसाहतीचा नकाशा पाहून अशी सूचना केली की, पोष्ट ऑफिससाठी ३२० चौ. मी. भूखंडावरील आरक्षण बदलून तेथे शॉपिंग सेंटरची योजना आखावी. बालवाडीसाठी असलेल्या २९३ चौ. मी. च्या भूखंडासाठी जाहिरात देऊन बालवाडी व प्राथमिक शाळेसाठी सरकार मान्य शिक्षण संस्थेकडून निविदा बोलावून भूखंडाचे वितरण करावे.

लेबर कॉलनी, लातूर, नंदुरबार, येवला येथील मंडळाच्या वसाहतीतील भूअभिन्यासामध्ये शाळेसाठी आरक्षीत केलेल्या भूखंडाची जाहिरात काढून शासन मान्य शिक्षण संस्थेस सदर भूखंडाचे वाटप करावे असे मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले.

तसेच सातपूर-नासिक येथील मंडळाच्या वसाहतीतील भूअभिन्यास मध्ये दवाखान्यासाठी ४००७ चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड आरक्षीत केला आहे. सदर भूखंड महानगरपालिका यांना देऊ केला असता तो विनामुल्य हस्तांतरीत करावा असे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापी नियमाप्रमाणे भूखंड विनामुल्य देता येत नसल्याने त्या भूखंडाचे वाटप कसे करावे ह्यावर सखोल चर्चा करण्यांत आली. यासंबंधी चर्चा करतांना श्री. द. मो. गोडघाटे उपसंचालक नगररचना यांनी सदर मंडळाच्या वसाहतीच्या अभिन्यासाचे अवलोकन करून असे सांगितले की, ४००७ चौ. मी. चा भूखंड हा दवाखान्यासाठी जास्त होईल व खाजगी वैद्यकीय व्यवसायिकाकडून याला प्रतिसाद मिळणार नाही. तेंव्हाकाही भागावरील आरक्षण बदलून निवासी गाळ्याची/भूखंडाची योजना घ्यावी. यावर सभापतींनी सांगितले की, एवढया मोठया भूखंडास खाजगी व्यावसायिक डॉक्टराकडून मागणी येणार नाही. म्हणून अशी सूचना केली की, ५० टक्के भूखंड निवासी क्षेत्रासाठी ठेवावा व ५०% भूखंड दवाखान्यासाठी ठेवावा.

..४..

ठराव क्र. २४८

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेतला की,

१] एकनाथनगर येथील वसाहतीत पोस्ट ऑफिससाठी व प्राथमिक शाळेसाठी आरक्षीत असलेल्या भूखंडासाठी पोष्ट ऑफिस व महानगर-पालिका औरंगाबाद यांच्याकडे पाठपुरावा करावा.

२] सहयोगनगर नांदेड येथील मंडळाच्या वसाहतीत पोष्ट ऑफिस साठी असलेले आरक्षण बदलून शॉपींग सेंटरची योजना घ्यावी व बाल-वाडीसाठी २९३ चौ.मी.च्या भूखंडासाठी शासन मान्य शिक्षण संस्थांकडून जाहिरात देऊन निविदा मागवाव्यात.

३] लातूर, नंदुरबार, येवला येथील वसाहतीत शाळेसाठी आरक्षित असलेल्या भूखंडासाठी शासन मान्य शिक्षण संस्थाकडून निविदा मागवून भूखंडाचे वाटप करावे व फायरस्टेशन, गार्डनसाठी आरक्षीत असलेले भूखंड नगरपालिकेला व फायरस्टेशनच्या खात्याशी संपर्क साधावा.

४] सातपूर, नासिक येथील मंडळाच्या वसाहतीत दवाखान्यासाठी आरक्षीत असलेला भूखंड ४००७ चौ.मी.चा त्यापैकी २००७ चौ.मी. च्या भूखंडावर निवासी गाळ्याची योजना तयार करावी व २००० चौ.मी. च्या भूखंडावर दवाखान्याचे आरक्षण ठेवावे.

मंडळाच्या वेगवेगळ्या वसाहतीतील भूखंडावरील आरक्षण बदलून घेण्यासाठी सुधारीत प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवून मंजूरी घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

विषय क्र. ५:- भुसावळ येथील अर्जदारांना गाळ्याऐवजी भूखंड वाटप करण्या बाबत मंजूरी देणे.

ठराव क्र. २४९

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, ज्या अर्जदारांनी घराकरिता नोंदणी केलेली आहे त्यांना घराऐवजी भूखंड देण्यात यावे व त्यांना सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यास सांगून स्वत:च्या मदतीने घरे बांधण्यास प्रवृत्त करावे.

विषय क्र. ६:- भूसंपादनातून वगळण्यांत आलेल्या व जमिनी बाबतचा तपशील मंडळाच्या माहितीकरिता.

ठराव क्र. २५०

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. गृहनिर्माणाचा : कार्यक्रम राबविण्यासाठी जळगांव, अमळनेर, धुळे येथील काही अधिसूचीत जमिनी शासनाकडे वर्ग झाल्यानंतर शासनाकडून वगळण्यांत आलेल्या आहेत त्याची मंडळाने नोंद घेतली.

विषय क्र. ७:- औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सिडको भागातील व एकनाथनगर भागातील वसाहतीमधील बाहय सुविधांचा दर्जा सुधारण्या बाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, औरंगाबाद येथील एकनाथनगर व सिडको एन-५ व एन-६ या वसाहतीतील सुविधांचा दर्जा महानगरपालिकेच्या मानकाप्रमाणे करण्यासाठी शासनाकडून रु. १५.०० लाखाचे अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु सदर अनुदान हे मार्च ९० अखेर पर्यंत खर्च करावयाचे आहे.

उपसभापतींनी असे सांगितले की, सिडकोतील मंडळाच्या वसाहतीतील सुविधांचे काम केल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिका त्या सुविधा हस्तांतरीत करुन घेणार नसल्यामुळे अडचणी निर्माण होतात.

आयुक्त महानगरपालिका यांचे सदस्य प्रतिनिधी श्री. जंबगी यांनी सांगितले की, एकनाथनगर वसाहतीतील सुविधासाठी असलेली पूर्ण रक्कम द्यावी. तो खर्च आम्ही करु व तेथील सुविधा देखभालीसाठी महानगर-पालिकेकडे हस्तांतरीत करुन घेऊ.

श्री. द. मो. गोडघाटे यांनी सांगितले की, सिडको एन-५ व एन-६ येथील सुविधांची कामे मंडळाने करावी परंतु महानगरपालिकेच्या मानकाप्रमाणे अंदाजपत्रके तयार करुन महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासून घ्यावीत व तशा प्रकारची त्यांची प्रतिस्वाक्षरी घ्यावी म्हणजे पुढे हस्तांतराचे वेळी अडचण निर्माण होणार नाही.

..६..

सदर कामे करण्यासाठी वेळ कमी असल्यामुळे तातडीने कामे होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे सूचना मंडळाच्या सदस्याकडून आल्यात.

१. सिडको एन-५ व एन-६ येथील डांबरीकरणाच्या कामाच्या अल्प मुदतीच्या निविदा बोलावून कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांनी आठ दिवसाच्या आंत कामास सुरवात करावी.

२. ड्रेनेज लाईनचे काम मंडळाने करावे.

३. पाणी पुरवठयाच्या संदर्भात महानगरपालिका औरंगाबादशी चर्चा करून सदर काम त्यांच्या मानकाप्रमाणे त्यांच्या मार्फत करवून घ्यावे.

४. रस्त्यावरील दिव्यासंबंधी वीज मंडळाशी संपर्क साधून त्यांच्याकडून सदर काम करून घ्यावे. अशी सूचना श्री. द.मो. गोडघाटे यांनी केली.

उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने मा. सभापतींनी अशी सूचना केली की, सदर कामे घेण्यासाठी आणि मार्च ९० च्या आंत खर्च होण्यासाठी महानगरपालिकेशी चर्चा करून पाठपुरावा करावा.

<u>ठराव क्र. २५१</u>

मंडळाने चर्चेअंती असा निर्णय घेतला की, एकनाथनगर वसाहतीच्या सुविधाचे नुतनीकरण करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेकडे रु. २.७५ लक्ष भरावे. व सर्व सुविधा देखभालीसाठी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत कराव्यात. तसेच सिडको एन-५ व एन-६ येथील सुविधांची कामे तत्परतेने होण्यासाठी मंडळाने प्रयत्न करावेत म्हणून

१] सिडको एन-५ व एन-६ वसाहतीतील रस्त्याचे कामे कार्यकारी अभियंता, औरंगाबाद मंडळ यांनी अल्प मुदतीच्या निविदा बोलावून करावे.

२] पाणी पुरवठयाच्या लाईनचे काम मंडळाच्यावतीने महानगरपालिकेतर्फे त्यांच्या मानकाप्रमाणे करून घेण्यांत यावे.

३] ड्रेनेज लाईनचे काम मंडळाने करावे.

४] वीजेच्या दिव्याचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून करून घ्यावे. परंतु सदर कामे महानगरपालिकेच्या मानकाप्रमाणे करावीत व त्या कामाची अंदाजपत्रके महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासून घेऊन त्यांची संमती घ्यावी म्हणजे मंडळाच्या वसाहतीतील सुविधा हस्तांतरणास अडचण निर्माण होणार नाही.

विषय क्र. ८:- सातपूर, नासिक येथील १०४+७८ उच्च उत्पन्न गटातील गाळयांना सांडपाण्याची व्यवस्था उपलब्ध करून देणे.

उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, औरंगाबाद मंडळाने सातपूर, नासिक येथील वसाहतीत १०४+७८ उच्च उत्पन्न गटाचे गाळे बांधुन गाळेधारकांना वाटप केलेले आहेत. तेथील बाहय सुविधाचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. कारण गाळेधारकांच्या आरोग्यास बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. या सुविधाचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी प्राधिकरणामार्फत प्रस्ताव शासनास पाठवावा किंवा हया योजनेवर आकस्मीत दायीत्व हया बाबीकरिता उपलब्ध असलेल्या रु. २,८८,५१९/-या तरतुदीतून खर्च करण्यास प्राधिकरणाची मंजूरी दयावी असे मंडळाच्या सदस्यांनी विचारणा केली.

यावर चर्चा करतांना मा. सभापतींनी सूचना केली की, ज्या प्रमाणे औरंगाबाद येथील एकनाथनगर व सिडको एन-५ व एन-६ या वसाहतीतील सुविधाचे नुतनीकरण करण्यासाठी शासनाकडून अनुदान मिळाले त्याप्रमाणे, मंडळाच्या सातपूर, नासिक, परभणी, नांदेड या वसाहतीतील सुविधाचे नुतनीकरण करण्यासाठी अनुदान मिळावे म्हणून मंडळाच्या शिफारशीसह प्राधिकरणामार्फत शासनास प्रस्ताव पाठवावा.

ठराव क्र. २५२

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, सातपूर नासिक [१०४+७८] गाळे उच्च उत्पन्न गट, परभणी, नांदेड या वसाहतीतील सुविधाचे नुतनीकरण करण्यासाठी प्राधिकरणास विनंती करून सदर प्रस्ताव शासनाकडे शिफारशी-सह पाठविण्यास मंडळाने मान्यता दिली.

आयत्यावेळचा विषय.

विषय क्र. १:- नासिक येथील गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, गलिच्छवस्ती सुधारणा योजने अंतर्गत संडास, नळ, गटारे,

रस्ते व दिवे इत्यादी सुविधा पुरविण्याची कामे नगरपालिका/ महानगरपालिकेतर्फे करण्यांत येतात. या कामांना प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाने मंडळाला दिलेल्या अधिकारानुसार प्रदान करण्यांत येते. प्रशासकीय मान्यता प्रदान करतांना दरडोई रु. २५०/- पर्यंत खर्चास मंजूरी देण्यांत येते. प्रशासकीय मान्यतेनंतर महानगरपालिकांनी प्रथम खर्च करुन अशा खर्चाची प्रतिपूर्ती मंडळाकडून नियमाप्रमाणे करुन घ्यावयाची असते. सदर खर्चाची प्रतिपूर्ती जिल्हा नियोजन व विकास परिषदेने केलेल्या तरतूदीतून करण्यांत येते.

गलिच्छवस्ती सुधार योजना नासिक महानगरपालिकेकडून राबविल्या जातात. गलिच्छवस्ती सुधार कामाचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मंडळाकडे प्राप्त होतात. नासिक महानगरपालिकेने केलेल्या कामाच्या देयकांची प्रतिपूर्ती करण्यासाठी मंडळाकडे प्राप्त झाली असता मंडळाच्या असे निदर्शनास आले आहे की, नासिक महानगरपालिकेतर्फे त्यांच्या पातळीवर तांत्रिक मान्यता देऊन प्रशासकीय मान्यतेपुर्वी कामे करण्यांत येऊन महानगरपालिकेने स्वत:च्या निधीतून खर्च करुन प्रतिपूर्तीसाठी अग्रीमाची मागणी केलेली आहे. त्यामुळे अग्रीम मंजूर करतांना कायदेशीर अडचणी निर्माण होतात असे उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना सांगितले.

प्रशासकीय मान्यतेपुर्वी व राजपत्रात गलिच्छवस्ती शासनाने घोषित करण्यापुर्वी महानगरपालिका नासिकने त्यांच्या स्तरावर तांत्रिक मान्यता देऊन कामे करुन घेतली व नंतर मंडळाकडे अग्रीमाची मागणी केली अशा गलिच्छवस्त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | घोषित झाल्याचा दिनांक | प्रशासकीय मान्यता दिनांक | प्रत्यक्ष काम सुरु झाल्याचा दिनांक | मनपाने ठेकेदारास अदा केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | फकीरवाडी रस्ते | १३.३.८० | १६.१.८९ | १५.४.८८ | ९.५.८९ | |
| २. | नागचौकी शौचालय गटारे | २३.२.८९ | ६.१.९० | २३.१२.८६<br>१५.७.८६ | २८.७.८९<br>६.६.८८ | सदर देयक ठेकेदारास अग्रीम दिल्याचे आहे. |

या वर मा.सभापतींनी अशी सूचना केली की, सदर बाब मंडळाच्या नियमात बसणारी नाही. त्यामुळे सदर अग्रीम देयकांची प्रतिपूर्ती बाबत विचार करु नये.

ठराव क्र. २५३

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, नासिक महानगरपालिकेने फकीरवाडी येथील कामे मंडळातर्फे प्रशासकीय मान्यता घेण्यापुर्वी तसेच नागचौकी येथील कामे गलिच्छ वस्ती घोषित करण्यापुर्वी व प्रशासकीय मान्यता घेण्यापुर्वी केलेली असल्याने सदर कामाचे खर्चाची प्रतिपुर्ती करण्यांत येवू नये.